नाकासमोर सरळ चालावे तर
अंगाला वाहने येऊन भिडतात
अंथरून पाहून अंग पसरावे तर
कोणी ते अलगद काढून नेतात.
दुसऱ्याचे उणे काढू नये तर
सगळे फक्त तेच करतात,
खोटे कधी बोलू नये तर
खरे सांगायला सगळेच भितात!

नीती अशी अधांतरी आसमंतात
भविष्याची कसली स्वप्ने
असतात त्यांच्या उरांत ?

१९.१.२०१९